# दिव्य वार्ता






गुरुवार दि.१४ नोव्हेंबर २०२४



# झक मारली अन् क्षीरसागरांना निवडून दिले अशी म्हणण्याची वेळ आता येणारच नाही!



अनिल दादांच्या बीड शहरातील कॉर्नर बैठकांमध्ये क्षीरसागरांना वैतागलेल्या बीडकरांनी व्यक्त केला संताप

## दादा, क्षीरसागरांना आम्ही पुरते वैतागलो असून आमच्यासाठी तुम्हीच एक आश्वासक चेहरा आहात!

बीड । दिव्य न्युज : बालाघाट अनिलदादा यांच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभा राहिल्यानंतर काल दि. 11 नोव्हेंबर रोजी बीड विधानसभेचे उमेदवार अनिलदादा जगताप यांनी आपला प्रचार दौरा बीड शहराकडे वळवला. काल सकाळपासून अनिलदादा यांनी बीड शहरातील संत नामदेव नगर, बालेपीर, पंचशील नगर, खडकपुरा, हिरालाल चौक, इंद्रप्रस्थ कॉलनी, बांगरनाला, अजमेर नगर, गोरे वस्ती, ड्राइवर पॉईंट बार्शी रोड, चक्रधर नगर अशा विविध भागात कॉर्नर बैठका घेऊन नागरिकांशी संवाद साधला. या बैठकात बीड शहरवासियांनी रस्ते, नाली, पाणी, कचरा, पथदिवे या मूलभूत गरजांची पूर्तता सत्ताधारी क्षीरसागर यांनी केली नाही. आम्ही क्षीरसागरांना पुरते वैतागलो असून आता क्षीरसागर मुक्त बीडसाठी आमच्यासमोर फक्त तुम्हीच एक आश्वासक चेहरा आणि नेतृत्व आहात, अशा भावना मतदारांनी यावेळी व्यक्त केल्या.







### अनिलदादा आमची तुम्हाला खंबीर साथ, बीडकरांनी व्यक्त केल्या भावना

अनिलदादा आमची तुम्हाला पूर्ण साथ आहे. तुम्ही आमदार होऊन आमचे कैवारी बना आणि आम्हाला विकासाचा चेहरा दाखवा. आशा भावना बीड शहरवासियांनी अनिलदादांसमोर व्यक्त केल्या. उपस्थित जेष्ठ मंडळी, महिला भगिनी आणि तरुणांनी भरभरून प्रतिसाद देत दादा, यंदा तुम्हाला निवडून आणू. असा आम्ही निर्धार केला असल्याची भावना व्यक्त केली. माजी राज्य मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी मगरूर क्षीरसागरांपासून बीड मुक्त करण्याचा आम्ही प्रण केला असून आम्हाला तुमची साथ हवी आहे असे आवाहन केले. बैठकी स्थळी माजी राज्यमंत्री प्रा सुरेशजी नवले आणि अनिलदादा जगताप यांचे आगमन होताच नागरिकांकडून हृदय सत्कार करून जोरदार स्वागत करण्यात आले. महिला भगिनींनी औक्षण करून विजयासाठी शुभेच्छा दिल्या. अनिलदादा यांच्या प्रचार बैठकांचे प्रस्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांच्यासोबत सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### क्षीरसागर मुक्त बीड केल्याशिवाय गप्प बसणार नाही- अनिलदादा जगताप

बीड शहरातील विविध भागात प्रचार बैठकीत शहरवासियांनी अनिलदादा यांच्यासमोर दैनंदिन समस्यांचा टाहो फोडल्यानंतर या बैठकीत जेष्ठ मंडळी, महिला भगिनी तथा युवकांच्या समस्या समजून घेऊन अनिलदादा यांनी संवाद साधताना पोकळ आश्वासन नाहीतर तर शब्द दिला की, बीडवासियांच्या मूलभूत गरजा सोडवून बीडचा विकास करण्यासाठी मी उभा आहे. सर्वसामान्य घरातील मी एक शेतकऱ्याचा मुलगा आहे. मला एकदा संधी द्या, तुम्हाला वाऱ्यावर सोडणार नाही, घेतला वसा टाकणार नाही. तुम्हाला छळलेल्या क्षीरसागरांपासून बीड मुक्त केल्याशिवाय मी गप्प बसणार नाही. तुमचे मूलभूत प्रश्न मी सोडविल असे सांगितले. तसेच बीडचा सर्वांगीण विकास करण्यासाठी एकदा आम्हाला संधी द्या, येणाऱ्या 20 नोव्हेंबर रोजी सर्वनी एव्हीएम मशीनवरील अनुक्रमांक 13 चिन्ह शिवण यंत्र हे बटन दाबून मतदान रुपी आशीर्वाद द्या असे आवाहन अनिलदादा जगताप यांनी बीड शहरवासियांना केले.

**बीड शहरवासियांनी अनिलदादांच्या प्रचार बैठकीत दैनंदिन समस्यांचा टाहो फोडून दिला क्षीरसागर मुक्तीचा नारा!**

**क्षीरसागरांनी आमची मते घेऊन आम्हाला वाऱ्यावर सोडले; बीड शहरवासियांची खदखद!**

**अनिलदादा आमची तुम्हाला पूर्ण साथ आहे, तुम्ही आमदार होऊन आमचे कैवारी बना!!**

## वझर ते जिंतूर बस व दुचाकी स्वारचा अपघात; दुचाकीस्वार गंभीर जखमी





जिंतूर / दिव्य न्युज : सालेह चाऊस

आज दिनांक १४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२: ३० वाजता जिंतूर महामडळची बस क्र एम एच २० - ३४९४ ही बस वझर या गावाकडून येत असताना सक्राळा बॉमणी फाट्याजवळ एक मोटार सायकल स्वार ने बस समोरून जोरदार धडक दिल्याने शे तैखीर शे फय्युम यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने बेशुद्ध पडले होते त्याना महामंडळ चे वाहक मोहसीन पठाण यांनी तत्काळ खाजगी जीप ने जिंतूरच्या ट्रामाकेअर ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले होते परंतु त्याची प्रकृती गंभीर असल्याने जिंतूर च्या डॉक्टरांनी जिल्हा रुग्णालय परभणी येथे अबुलन्स द्वारे रेफर केले आहे असे आमचे प्रतीनीधी यांनी कळविले आहे.

## किनवट मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची १६ नोव्हेंबरला तृतीय तपासणी

किनवट । दिव्य न्युज : विशाल भालेराव

भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ८३- किनवट विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तृतीय तपासणी गुरुवारी १६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ यावेळेत ८- किनवट विधानसभा मतदार संघाकरिता नियुक्त खर्च निरिक्षक मयंक पाण्डेय (आयआरएस) यांच्या उपस्थितीत निवडणूक खर्च तपासणी कक्ष, आय. टी.आय. , किनवट येथे केली जाणार आहे. या तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षक यांच्यासमोर सादर करणे आवश्यक आहे.




अनुपस्थित राहणारे उमेदवार भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रकांनुसार कार्यवाहीस पात्र असतील. तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवणे व दाखल करण्याच्या कायद्याच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने कसूर केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १० क अन्वये तो निवडणूक आयोगाकडून तीन वर्षाच्या कालावधीसाठी निरर्ह ठरविण्यास पात्र असेल याची नोंद घ्यावी. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम , १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार एकतर तो स्वत: , ती स्वत: किंवा त्याच्या, तिच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे त्याला, तिला नामनिर्देशित करण्यात आले आहे. त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागण्याच्या दिनांकापर्यंत दोन्ही दिनांक धरुन, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे, असे ८३- किनवट विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली.

## ‘ज्ञानराधा’वर आता अवसायक

### सहकार निर्णयाने मालमत्ता लिलावावर प्रश्नचिन्ह




सुरवातीला ज्ञानराधाच्या कर्जदारांची यादी काढून त्यातून वसुलीचे प्रयत्न; तसेच संचालक व संस्थांच्या मालमत्तांच्या लिलावातून मिळणाऱ्या पैशांतून ठेवीदारांची देणी देण्याचे प्रयत्न केले जातील. कायदा व नियमांचे पालन करून कार्यवाही केली जाईल.

– समृत जाधव, अवसायक, ज्ञानराधा मल्टिस्टेट

#### पोलिस, ईडी आणि आता अवसायक

या गुन्ह्यांचा एकत्रित तपास करणाऱ्या आर्थिक गुन्हे शाखेनेदेखील संचालक व संस्थेच्या मालमत्ता जप्त केल्या. मालमत्तांच्या लिलावासाठी एमपीआयडीनुसार प्रस्ताव केला जात असतानाच ईडीनेही याच मालमत्तांवर टाच आणली आहे. त्यात आता पुन्हा अवसायक नेमल्याने त्यांना मालमत्ताजप्ती व लिलाव करायचा तर कसा, असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत

बीड । दिव्य न्युज

पावणेचार लाख ठेवीदारांच्या ३ हजार ७१५ कोटी रुपयांच्या ठेवी अडकलेल्या येथील ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीवर केंद्रीय सहकार विभागाने अवसायकाची नेमणूक केली आहे. जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) समृत जाधव अवसायक म्हणून कामकाज पाहणार आहेत. केंद्रीय निबंधक रवींद्र कुमार अग्रवाल यांनी याबाबतचे आदेश काढले.

जिल्ह्यासह राज्यात व इंदूर अशा ५० शाखा असलेल्या ज्ञानराधा मल्टिस्टेटच्या सर्व शाखांतील व्यवहार वर्षभरापासून ठप्प आहेत. फसवणूकप्रकरणी जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांत ४९ गुन्हे नोंद असून अध्यक्ष सुरेश कुटे, संचालक आशिष पाटोदकर, उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी आदी कोठडीत आहेत. ज्ञानराधा मल्टिस्टेटमध्ये तीन लाख ७२ हजार खातेदार व ठेवीदारांचे ३,७१५ कोटी रुपये आहेत. दरम्यान, आर्थिक फसवणुकीचा गुन्हा असल्याने पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने सुरेश कुटेसह संबंधित संचालक व अधिकाऱ्यांच्या ५ हजार ७६५ कोटी २४ लाख रुपयांच्या मालमत्ता जप्त केल्या आहेत, तर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) देखील सुरेश कुटे व संबंधितांच्या यातीलच २,३०८ कोटी रुपयांच्या मालमत्तांवर टाच लावली आहे. आता केंद्रीय सहकार विभागाने जिल्हा उपनिबंधक समृत जाधव यांची ज्ञानराधावर अवसायक म्हणून नेमणूक केली आहे.

## शरद पवार vs अजित पवार (३७ जागा)

| मतदारसंघ | अजित पवार गट | शरद पवार गट |
|---|---|---|
| बारामती | अजित पवार | युगेंद्र पवार |
| अहेरी | धर्मरावबाबा आत्राम | भाग्यश्री आत्राम |
| येवला | छगन भुजबळ | माणिकराव शिंदे |
| दिंडोरी | नरहरी झिरवाळ | सुनीता चारोस्कर |
| आंबेगाव | दिलीप वळसे पाटील | देवदत्त निकम |
| श्रीवर्धन | आदिती तटकरे | अनिल नवघणे |
| परळी | धनंजय मुंडे | राजेसाहेब देशमुख |
| उदगीर | संजय बनसोडे | सुधाकर भालेराव |
| कागल | हसन मुश्रीफ | समरजीत घाटगे |
| इस्लामपूर | जयंत पाटील | निशिकांत पाटील |
| इंदापूर | दत्तात्रय भरणे | हर्षवर्धन पाटील |
| मुंब्रा कळवा | नजीब मुल्ला | जितेंद्र आव्हाड |

## उद्धवसेना vs शिंदेसेना (५२ जागा)

| मतदारसंघ | शिंदेसेना | उद्धवसेना |
|---|---|---|
| पाचपाखाडी | एकनाथ शिंदे | केदार दिघे |
| वरळी | मुरली देवरा | आदित्य ठाकरे |
| सिल्लोड | अब्दुल सत्तार | सुरेश बनकर |
| औरंगाबाद प. | संजय शिरसाट | राजू शिंदे |
| नांदगाव | गणेश धात्रक | सुहास कांदे |
| मालेगाव बा. | दादा भुसे | अद्वय हिरे |
| रत्नागिरी | उदय सामंत | सुरेंद्रनाथ माने |
| पाटण | शंभुराज देसाई | हर्षद कदम |

## भाजप vs उद्धवसेना (30 जागा)

| मतदारसंघ | भाजप | उद्धवसेना |
|---|---|---|
| कणकवली | नितेश राणे | संदेश पारकर |
| मलबार हिल | मंगलप्रभात लोढा | भैरू चौधरी |
| ऐरोली | गणेश नाईक | एम के मढवी |
| डोंबिवली | रवींद चव्हाण | दीपेश म्हात्रे |
| कल्याण पूर्व | सुलभा गायकवाड | धनंजय बोडारे |

## मनसे vs शिंदेसेना vs उद्धवसेना (२८ जागा)

| जागा | मनसे | शिंदेसेना | उद्धवसेना |
|---|---|---|---|
| माहीम | अमित ठाकरे | सदा सरवणकर | महेश सावंत |
| शिवडी | बाळा नांदगावकर | | अजय चौधरी |
| वरळी | संदीप देशपांडे | मुरली देवरा | आदित्य ठाकरे |
| ठाणे | अविनाश जाधव | | राजन विचारे |
| कल्याण ग्रा. | राजू पाटील | राजेश मोरे | सुभाष भोईर |

# मुस्लीम मतांचा गठ्ठा आघाडीच्या पारड्यात

## मौलाना सज्जाद नोमानी यांनी घेतला निर्णय, जरांगे पाटील, राजरत्न आंबेडकरांची भूमिका गुलदस्त्यात





### राज्यात २६९ उमेदवारांना दिला पाठिंबा

### मराठा-ओबीसीच्या ११७ तर २३ मुस्लीम उमेदवारांना समर्थन

**संदीप क्षीरसागर, बदामराव पंडित, राजेसाहेब देशमुख, पृथ्वीराज साठे,मोहन जगताप यांना विजयी करण्याचे आवाहन**





### 'एम' फॅक्टरचा झाला होता प्रयत्न

विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर मनोज जरांगे पाटील, सज्जाद नुमानी आणि राजरत्न आंबेडकर हे एकत्र येऊन विधानसभा निवडणुकीत आपले उमेदवार उभे करण्यासाठी तयारी करत होते. परंतु जरांगे पाटलांनी निवडणुकीतून ऐनवेळी माघार घेतली आणि अपक्ष म्हणून ज्यांनी अर्ज दाखल केले आहेत, त्यांना अर्ज काढून घेण्याचे सांगितले. नुमानी आणि आंबेडकर यांच्याकडून त्यांच्या उमेदवारांची नावे आली नाहीत, त्यामुळे एका जातीवर निवडणूक जिंकता येत नाही, असे जरांगे यांनी म्हटले होते.

बीड । दिव्य न्युज

निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आलेला असतानाच आता राजकारणात खळबळ उडवून देणारी माहिती समोर आली आहे. ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते मौलाना खलील उररहमान सज्जाद यांनी पत्रकार परिषद घेऊन राज्यातील २६९ उमेदवारांना मुस्लीम समाजाचा पाठिंबा देत असल्याची घोषणा केली आहे. उल्लेखनीय म्हणजें या यादीतील सर्व उमेदवार महाविकास आघाडीचे आहेत. यासंदर्भात बोलताना नोमानी म्हणाले, आम्ही ज्या उमेदवारांना पाठिंबा दिला आहे, त्यामध्ये मराठा आणि ओबीसी समाजाचे ११७ उमेदवार आहेत तर २३ मुस्लीम उमेदवार आहेत.

निवडणुकीपूर्वी आम्ही मुस्लीम समाजातील सर्वांना याच उमेदवारांना मतदान करण्यासाठी सांगणार आहोत, असे सांगत ते म्हणाले, ऑल इंडिया उलेमा बोर्डाने ९ नोव्हेंबरला आपल्या १७ मागण्यांचे एक सविस्तर निवेदन महाविकास आघाडीला दिले होते. या मागण्यांसदर्भात महाविकास आघाडीने सकारात्मक भूमिका घेतलेली असल्याने आम्ही महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. मस्लीम समाजाचे काही प्रश्न आहेत. अनेक वर्षापासूनच्या काही प्रलंबित मागण्या आहेत. त्या सोडविण्यासाठी योग्य भूमिका घेण्याचे आश्वासन आघाडीकडून देण्यात आलेले आहे. बैठकीत काय ठरले? यादीत कोणाची नावे ? जी यादी प्रसिध्दीसाठी देण्यात आली आहे, त्यामध्ये बीडमधील महाविकास आघाडीच्या सहाही उमेदवारांची नावे आहेत. याशिवाय राज्यातील महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांची नावेही देण्यात आली आहेत. या यादीवर मनोज जरांगे पाटील आणि राजरत्न आंबेडकर नेमके काय सांगतात, याची उत्सुकता आता राजकीय वर्तुळात आहे.

## महायुतीचे उमेदवार विलास बापू भुमरे यांचे राहुलनगर राजीव नगर येथे जंगी स्वागत

पैठण । दिव्य न्युज : व्ही. एन.खंडागळे.

पैठण विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधीकृत उमेदवार विलास बापु भुमरे यांनी धनगाव, इसारवाडी, मुधलवाडी, पिंपळवाडी (पि)राहुल नगर, राजीव नगर, जायकवाडी उत्तर, आखादवाडा, करंजखेडा, सोलनापूर, रहाटगाव गावांत पदयात्रा काढत मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेत पदयात्रा काढून आपल्या प्रचाराला वेग दिला व या गावभेट प्रचारा दरम्यान गावागावांतील माता भगिनींचा तसेच पुरुष व नवतरुण मतदारांचा मिळनारा प्रतिसाद पाहता विरोधी पक्ष उमेदवारांच्या पाया खालची जमीन सरकली आहे.

महायुतीचे उमेदवार विलास संदीपान भुमरे यांच्या गाव भेट प्रचारा दरम्यान कातपुर ग्राम पंचायत अंतर्गत येणाऱ्या राहूलनगर, राजीव नगर या गावागावातील माता भगिनींनी त्यांचे औक्षण करुन विजयी करण्याची हमी दिली. तसेच राहुलनगर,राजीवनगर येथे पदयात्रा रॅली काढण्यात आली या रॅलीत महीला पुरुष यांच्यासह नवतरुण मतदारांनी मोठया संख्येने सहभागी होवुन महायुतीचे उमेदवार विलास बापू भूमरे यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी मतदारांशी संवाद साधताना विलास बापू भुमरे यांनी महायुती सरकारने त्यांच्या कार्यकाळात महत्वाकांक्षी अशी लाडकी बहीण योजना राबवली तसेच लोकनेते मा.भुमरे साहेबांच्या माध्यमातुन तालुक्यातील बेघरांसाठी साडेसहा हजार घरकूल मंजूर करून घेतले.मागेल त्या शेतकऱ्याला गाय गोठे, विहिरी, शेत रस्ते,पाणंद व गवांतर्गत रस्त्या साठी भरघोस निधी दिला. भूमरे साहेबांच्या माध्यमातुन तालुक्यातील

▶▶ पान २ वर






महाविकास आघाड़ी चे बीड विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे उमेदवार संदीप भैय्या क्षीरसागर साहेब यांच्या प्रचारार्थ आज सय्यद अली नगर येथे जावून प्रचार करुण संदीप भैय्या क्षीरसागर याना शुभेच्छा दिल्या या वेडेस राष्ट्रवादी कांग्रेस चे आदरणीय माजी आमदार सय्यद सलीम साहेब, जावेद भैय्या कुरैशी व या भागासर्व श्रेष्ठ मान्यवर व नागरीक उपस्तीथ होते. या वेडी राष्ट्रीय कांग्रेस निराधार निराश्रित विभाग चे बीड जिल्हा उपअध्यक्ष शेख आमेर पाशा, राष्ट्रीय कांग्रेस ओबोसी विभाग चे बीड शहर अध्यक्ष सय्यद फरहान शराफत, राष्ट्रीय कांग्रेस निराधार निराश्रित विभाग चे बीड तालुका अध्यक्ष शेख जहीर अमीर, राष्ट्रीय कांग्रेस निराधार निराश्रित विभाग चे कार्य अध्यक्ष जमील अहमद खान, राष्ट्रीय कांग्रेस चे ओबीसी शहर उप अ ध्यक्ष शेख नाजेद, राष्ट्रीय कांग्रेस निराधार निराश्रित विभाग चे तोफिक तंबोली आदी उपस्थित होते

### इलेक्शन इन्फो । निर्यात उमेदवार

#### भाजपचे १७ उमेदवार शिंदेसेना, अजित पवार गटात निर्यात

निवडणुकीच्या तोंडावर भाजपमधून १७ उमेदवार महायुतीतील मित्र पक्षात गेले आहेत. शिंदेसेनेत १२, अजित पवार गटात ४ तर रिपाइंमध्ये १ जणाने पक्षांतर केले. यामुळे भाजपने अधिकृतपणे १५९ जागांवर उमेदवार उभे केले असले तरी प्रत्यक्षात पक्षाचे १६९ उमेदवार रिंगणात आहेत.

**भाजप ते शिवसेना : 12**

▪ **नीलेश राणे**, कुडाळ ▪ **संजना जाधव**, कन्नड ▪ **राजेंद्र गावीत**, पालघर ▪ **विलास तारे**, बोईसर ▪ **संतोष शेट्टी**, भिवंडी पूर्व ▪ **मुर्जी पटेल**, अंधेरी पूर्व ▪ **शायना एनसी**, मुंबादेवी ▪ **अमोल खटाळ**, संगमनेर ▪ **अजित पिंगळे**, धाराशीव ▪ **दिग्विजय बागल**, करमाळा ▪ **विठ्ठल लंघे**, नेवासा ▪ **बळीराम सिरसकर**, बाळापूर

**भाजप ते राष्ट्रवादी : 04**

▪ **राजकुमार बडोले**, अर्जुनी मोरगाव ▪ **प्रतापराव चिखलीकर**, लोहा-कंधार ▪ **निशिकांत पाटील**, इस्लामपूर ▪ **संजयकाका पाटील**, तासगाव

**भाजप ते रिपाइं : 01**

▪ **अमरजित सिंग**, कलिना

# जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना मतदान करून विजयी करा

## राज्यातील शरदचंद्र पवार सह महाविकास आघाडीचे हात बळकट करून राज्यात जातीयवादी सरकार नष्ट करा-दिलीप गोरे, फेरोज पठाण





नेकनूर । दिव्य न्युज

विधानसभा निवडणूकीसाठी २० तारेखला मतदान होणार आहे. आता पाच दिवस बाकी असून २० तारखेला बीड जिल्हयातील सुजान मतदारांनी सकाळी लवकर उठून लवकरात लवकर आपले मतदान जिल्हयातील महाविकास अघाडीचे सहाचे सहा उमेदवारांना देऊन विजय करा देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेब व महाविकास अघाडीचे हात बळकट करा राज्यातून जातीयवादी महायुतीचे सरकार उखळून फेका त्यास करीता आष्टीमधून महेबुब शेख , गेवराई मधून बदामराव पंडीत, बीडमधून संदीप क्षीरसागर, केज मधून पृथवीराज साठे, माजलगांवमधून मोहन जगताप, आणि परळी मधून राजेसाहेब देशमुख यांच्या तुतारी वाजविणारा माणूस आणि गेवराईमध्ये मशाल या चिन्हा समोरील बटन दाबून सहाच्या सहा उमेदवारांना विजय करा असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाचे ज्येष्ठ नेते



माजी नगराध्यक्ष दिलीप अण्णा गोरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेशउपाध्यक्ष फेरोज पठाण यांनी केले आहे.

▶▶ पान २ वर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफिससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०